**केंद्र पुरस्कृत योजनांचा निधी भारतीय रिझर्व्ह बॅंकेच्या ई-कुबेर प्रणालीच्या माध्यमातून वेळेवर (Just-in-Time) वितरीत करणेबाबत.**

**'SNA-SPARSH' अंतर्गत समावेश करण्यात आलेल्या राज्य योजनांबाबत सूचना.**

# महाराष्ट्र शासन

**परिपत्रक क्र.संकीर्ण-२०२३/प्र.क्र.४७/कोषा प्रशा-४**

वित्त विभाग, दालन क्र.३३७,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक- ११ जून, २०२४.

**वाचा :-** १. भारत सरकार, वित्त मंत्रालय, व्यय विभाग यांचे कार्यालयीन ज्ञापन F.No.1(13)/PFMS/ FCD/2020, दि.२३.०३.२०२१.

२. वित्त विभाग परिपत्रक क्रमांक संकिर्ण-२०२१/प्र.क्र.३५/कोषा प्रशा-४, दि.१ जुलै, २०२१.

३. भारत सरकार, वित्त मंत्रालय, व्यय विभाग यांचे कार्यालयीन ज्ञापन क्र. F.No.१(२७)/PFMS /२०२०, दि.१३.०७.२०२३.

४. वित्त विभाग, परिपत्रक क्र.संकीर्ण-२०२३/प्र.क्र.४७/कोषा प्रशा-४, दि.३.८.२०२३.

५. केंद्र शासन, वित्त मंत्रालय, व्यय विभाग (PFMS Division) यांचे कार्यालयीन ज्ञापन क्र. F.No.१(२७)PFMS/२०२०, दि.२१.०५.२०२४.

## परिपत्रक

भारत सरकारच्या सर्वसाधारण वित्तीय नियम, २०१७ मधील नियम २३२ (v) अन्वये, राज्य सरकारांना निधी वितरीत करणे आणि सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (PFMS) च्या माध्यमातून निधीच्या विनियोगाचे संनियंत्रण करणेबाबत तरतूद विहीत करण्यात आली आहे. त्यास अनुसरुन भारत सरकारच्या वित्त मंत्रालयाच्या व्यय विभागाद्वारे केंद्र पुरस्कृत योजनांसाठी राज्य सरकारांना वितरीत करण्यात आलेल्या निधीच्या संदर्भात निधीची उपलब्धता आणि विनियोग याचे प्रभावी संनियंत्रण करण्यासाठी तसेच Float कमी करण्यासाठी दि.१ जुलै,२०२१ पासून 'SNA Model' ही कार्यपध्दती कार्यान्वित करण्यात आली आहे.

२. 'SNA Model' कार्यान्वित करण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना उपरोक्त "वाचा" मधील अनुक्रमांक १ येथे नमूद भारत सरकारच्या वित्त मंत्रालयाच्या व्यय विभागाच्या दिनांक २३.०३.२०२१ रोजीच्या कार्यालयीन ज्ञापनान्वये निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. सदर मार्गदर्शक सूचना या विभागाच्या उपरोक्त "वाचा" मधील अनुक्रमांक २ येथे नमूद परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून देण्यात आलेल्या आहेत.

३.	भारत सरकारच्या सर्वसाधारण वित्तीय नियम, २०१७ मधील नियम २३० (७) अन्वये विहीत करण्यात आलेल्या तरतूदीनुसार "निधीचे वेळेत वितरण" (Just In Time Release) हे तत्व शक्य होईल तेवढया प्रमाणात सर्व प्रदानांच्या वितरणासाठी लागू केले जाणे अभिप्रेत आहे. केंद्र शासन आणि राज्य शासन या दोन्ही स्तरांवरील रोख व्यवस्थापनामध्ये (Cash Management) अधिक परिणामकारकता साध्य करण्यासाठी सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (PFMS), राज्याची एकात्मिक वित्तीय व्यवस्थापन माहिती प्रणाली (State IFMIS) आणि भारतीय रिझर्व्ह बॅंकेची ई-कुबेर प्रणाली (e-Kuber) यांच्या एकात्मिक रचनेच्या (Integrated Framework) माध्यमातून केंद्र पुरस्कृत योजनांचा निधी वितरीत करण्यासाठी **'SNA-SPARSH' (समयोचित प्रणाली एकीकृत शीघ्र हस्तांतरण- Real Time System of Integrated Quick Transfers)** ही पर्यायी निधी प्रवाह कार्यपध्दती (Alternative Fund Flow Mechanism) टप्या-टप्याने प्रस्तावित करण्याचा निर्णय उपरोक्त "वाचा" मधील अनुक्रमांक ३ येथे नमूद भारत सरकारच्या वित्त मंत्रालयाच्या व्यय विभागाच्या दिनांक १३.०७.२०२३ रोजीच्या कार्यालयीन ज्ञापनान्वये केंद्र शासनाद्वारे घेण्यात आला आहे. या प्रस्तावित पर्यायी निधी प्रवाह कार्यपध्दती अंतर्गत अंतर्भूत करावयाच्या योजना आणि राज्ये वेळोवेळी केंद्र शासनाकडून अधिसूचित करण्यात येतील, असे सदर कार्यालयीन ज्ञापनामध्ये नमूद करण्यात आलेले आहे.

४.	**'SNA-SPARSH Platform'** अंतर्गत अंमलबजावणीसाठी अधिसूचित केल्या जाणाऱ्या योजनांच्या अनुषंगाने भारत सरकारची मंत्रालये / विभाग आणि संबंधित राज्य सरकारे यांनी भविष्यात अनुसरणे अपेक्षित असलेल्या कार्यपध्दतीबाबत राज्य शासनास देण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनाबाबतच्या कार्यालयीन ज्ञापनाची प्रत उपरोक्त वाचा येथील अनुक्रमांक ४ येथे नमूद या विभागाच्या परिपत्रकाद्वारे सर्व प्रशासकीय विभागांना यापूर्वीच उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

५.	**'SNA-SPARSH Platform'** अंतर्गत अंमलबजावणीसाठी पहिल्या टप्प्यामध्ये ५ योजना आणि १० राज्यांचा समावेश करण्यात आला होता. त्यामध्ये महाराष्ट्राचा समावेश नव्हता. तथापि, आता उपरोक्त वाचा मधील अनुक्रमांक ५ येथे नमूद भारत सरकारच्या वित्त मंत्रालयाच्या व्यय विभागाच्या दिनांक २१.०५.२०२४ रोजीच्या कार्यालयीन ज्ञापनान्वये **'SNA-SPARSH Platform'** वर अतिरिक्त २२ योजना आणि १० राज्ये नव्याने समाविष्ट करण्यात आली असून त्याची अंमलबजावणी दि.१ जून, २०२४ पासून करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. नव्याने समाविष्ठ करण्यात आलेल्या १० राज्यांमध्ये महाराष्ट्र राज्याचा देखील समावेश करण्यात आला आहे.

६.	**'SNA-SPARSH Platform'** वर २० राज्यांमध्ये (१० विद्यमान + १० नवीन) लागू करावयाच्या २७ योजनांची (५ विद्यमान + २२ नवीन) यादी भारत सरकारच्या वित्त मंत्रालयाच्या व्यय विभागाच्या दिनांक २१.०५.२०२४ रोजीच्या कार्यालयीन ज्ञापनासोबतच्या परिशिष्ट-१ मध्ये दर्शविण्यात आली आहे.

७.	केंद्र पुरस्कृत योजनांची अंमलबजावणी करीत असलेल्या सर्व संबंधित प्रशासकीय विभागांनी भारत सरकारच्या उपरोल्लेखित कार्यालयीन ज्ञापनातील मार्गदर्शक सूचनांची गांभिर्याने नोंद घ्यावी. **'SNA-SPARSH Platform'** च्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने भारत सरकारकडून यापुढील काळात जशा-जशा सूचना प्राप्त होतील त्याप्रमाणे नियमोचित कार्यवाही करण्याची तजवीज सर्व संबंधितांनी ठेवावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०२४०६११७५२१२३८०५ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

DR RAJENDRA
UTTAMRAO GADEKAR

Digitally signed by DR RAJENDRA UTTAMRAO GADEKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT,
2.5.4.20=b8e8c3a034acb70f16af6f81c69ca038ff6f25ff78cfc9e6d815fd95b5367b07, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=37A42E182BACE4C129ABBEB54E27836D32D401560638F644A547867205474EE5, cn=DR RAJENDRA UTTAMRAO GADEKAR
Date: 2024.06.11 18:05:09 +05'30'

**( डॉ.राजेंद्र गाडेकर )**
**शासनाचे उप सचिव**

**सहपत्र- भारत सरकारचे दि.२५.०५.२०२४ चे**
**कार्यालयीन ज्ञापन (परिशिष्ट १ ते ४ सह)**

**प्रति ,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
३. मा.उप मुख्यमंत्री (गृह) यांचे सचिव,
४. मा. उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे सचिव,
५. सर्व मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
६. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा / विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई,
७. सर्व सन्माननीय विधानसभा / विधान परिषद व संसद सदस्य,
८. अ.मु.स. / प्र. स. / सचिव, सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,
९. सह सचिव (अर्थसंकल्प), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. उप सचिव (साधन संपत्ती), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
११. उप सचिव (का-१४१४), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. स्टेट नोडल ऑफीसर, SPMU, महाराष्ट्र स्टेट, ४ था मजला, एव्हरेस्ट हाऊस, मरीन ड्राईव्ह, मुंबई
१३. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांच्या अधिनस्त असलेले सर्व विभाग प्रमुख, प्रादेशिक कार्यालय प्रमुख व कार्यालय प्रमुख,
१४. प्रबंधक, मूळ न्यायालय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
१५. प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)- १, महाराष्ट्र, मुंबई,
१६. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई,
१७. महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर,
१८. आयुक्त, आयकर (TDS) चर्नीरोड, मुंबई ४०००२
१९. आयुक्त, आयकर (TDS) सिव्हील लाईन*, नागपूर ४४४००१
२०. प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा) मुंबई,
२१. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
२२. सचिव, महाराष्ट्र विधीमंडळ सचिवालय, मुंबई,
२३. प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
२४. प्रबंधक,महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,मुंबई,
२५. मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई,

२६. विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
२७. सर्व विभागीय आयुक्त,
२८. सर्व जिल्हाधिकारी,
२९. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
३०. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
३१. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
३२. प्रादेशिक सह संचालक, लेखा व कोषागारे, कोकण/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/अमरावती/ नागपूर,
३३. संचालक,स्थानिक निधी लेखापरिक्षा संचालनालय, नवी मुंबई,
३४. प्रादेशिक सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा कोकण/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/ अमरावती / नागपूर,
३५. वरिष्ठ जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजी नगर/अमरावती/नागपूर
३६. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
३७. वित्त विभागातील सर्व कार्यासने,
३८. निवड नस्ती/कोषा प्रशा-४